
ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME:III ISSUE II July-Sept.2019



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor

**Dr. Sarkate Sadashiv**

Coordinator, IQAC
JBSPM's Arts and Science College Patoda
Tq. Patoda Dist.Beed-414204

J.B.S.P.M.'s Arts & Science College
Patoda
Tq. Patoda Dist. Beed

Principal
J.B.S P.M.'s Arts & Science College
Patoda,Tq.patoda Dist.Beed

# अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | A Study of Social and Political Victims in Arundhati Roy's | Dr. Shivaji Pawar, | 1 |
| 2 | The Forgotten "First Nightangle" in My Garden ! | Dr.Khan A. S. | 6 |
| 3 | Effects Of Learning Disability On Academic Achievement Among school going Students. By | Dr.Bharat H Mimrot, | 11 |
| 4 | Spiritual Intelligence and Academic achievement of adolescence | Dr.S.M.Watore | 22 |
| 5 | RELIGION WISE POPULATION IN JALNA DISTRICT: A GEOGRAPHICAL ANALYSIS | Pramod B. Deshmukh, | 28 |
| 6 | A view of Thomas Kuhn and Growing Paradigm of Geography | Dr. Sonavane Sudarshan Venkatrao | 32 |
| 7 | Transformation of Raju from a Tourist Guide to a Spiritual Guide with Reference | Mrs. Sujata Gomteshwar Patil | 41 |
| 8 | A Study of Social and Political Victims in Arundhati Roy's | Dr.Waghmare M.S. | 47 |
| 9 | Resource sharing in electronic Era | Mrs.Dhanawanti Sunil Bamane. | 56 |
| 10 | IMPORTANCE OF GALLI KHAL, FOR ENHANCEMENT OF HUMAN HEALTH AND PERFORMENCE | Dr. Suresh Nalawade | 62 |
| 11 | Role of media in popularizing game of Kabaddi | Dr.K.G.Machale | 67 |
| 12 | A Research Article entitled Knowledge Process Outsourcing in India By | Dr. Rajendra Udhan, | 71 |
| 13 | Factors Affecting Smallholder Sugarcane Productivity | V.C. Borkarb<br>H. P. Thorata, | 76 |
| 14 | बहिणाबाईंच्या कवितेतील जीवनविषयक तत्वज्ञान | प्रा.रेखा व्ही.इंगोल | 85 |
| 15 | समकालीन सामाजिक स्थित्यंतरे आणि मराठी साहित्य | प्रा. डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | 89 |
| 16 | वारकरी संप्रदायातील फड : स्वरूप व कार्य | प्रा. डॉ. गोपाल ढोले | 95 |
| 17 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्र विषयक भूमीका | सुरवसे तुकाराम नागनाथ<br>डॉ. राजशेखर नळगे | 99 |
| 18 | मराठवाड्यातील कांदकरी | प्रा.डॉ.प्रधान रामकृष्ण ज्योतिबा | 103 |
| | दर्दनाक अनुभवों का यथार्थ:दलित साहित्य | डॉ. सय्यद शौकतअली | 108 |
| 19 | छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषी धोरण:एक दृष्टीक्षेप | प्रा. संजय मोतीराम दांदडे | 112 |




Coordinator, IQAC
JBSPM's Arts and Science College Patoda
Tq. Patoda Dist.Beed-414204

Principal
J.B.S.P.M.'s Arts & Science College
Patoda,Tq.patoda Dist.Beed

# मराठवाडयातील कांदबरी

प्रा.डॉ.प्रधान रामकृष्ण ज्योतिबा
मराठी विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय,पाटोदा जि. बीड

इंग्रजी सत्ता स्थिर झाल्यानंतर त्यांच्या शिक्षणविषयक धोरणाने महाराष्ट्रात ज्या समाजसुधारणाविषयक नव्या प्रवत्ती जन्माला आल्या त्या कालखंडात मराठी कादंबरीचा उदय झाला. ' यमुना पर्यटन ' ही बाबा पद्मजी यांची मराठीतील पहिली कांदबरी १८५७ मध्ये लिहिली गेली. ग्रामीण साहित्यात पहिली कादंबरी 'बळीबा पाटील ' कृष्णाराव भालेकर यांची.कादंबरी १८८७ मध्ये प्रकाशि झाली.' यमुना पर्यटन ' या कादंबरीत बालविवाह,स्त्रीशिक्षण, आणि विधवांचा प्रश्न आहे. तर ' बळीबा पाटील ' या कादंबरीत दुष्काळाग्रस्त शेकऱ्यांच्या दु:खाचे चित्रण आहे.

'बळीबा पाटील ' हा म.फुले यांच्या सत्यशोधकी चळवळीतील असल्यामुळे तो जात,धर्म,पंथाच्या आधारे माणसामाणसात भेद मानत नाही. १९२० नंतर ग्रामीण कादंबरीने आपले प्रादेशिक रुप धारण केले. र.वा.दिघे यांची 'सराई ', 'पानकळा ' ; वि.दा.चिंदरकर याची 'महांपूर ' ग.ल.ठोकळांची 'गावगुंड ' इत्यादीतुन सुरुवात होऊन १९४५-५० या कालखंडात प्रादेशिक जीवन चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या प्रामुख्याने श्री.ना.पेंडसे 'गारंबीचा बापू 'आणि गो.नि.दांडेकरांची 'पडघवली ' ,'पवनकाठचा धोंडी ', 'माचीवरला बुवा ' या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. याच काळात मराठवाडयातील कादंबरी लेखनालाही सुरुवात झालेलीच होती.

निजामी राजवटीत एकूणच शिक्षणाविषयक उदासिनता आणि मराठीची गळचेपी यामुळे मराठीतील साहित्य निर्मितीला पोषक वातावरण नव्हते. अशाही काळात कथा, कविता आणि कादंबरी या साहित्यप्रकारातून लक्षणीय साहित्यानिर्मिती करणाऱ्या बी.रघुनाथ यांच्या कादंबऱ्यापासूनच मराठवाडयातील मराठी कांदबरीचा विचार करता येईल. ते ज्या काळात लिहित होते तो कालखंड राजकीय आणि सामाजिकदृष्टयाही अनेकार्थाने धकाधकीचा होता. दोन भीषण महायुध्दे जगाला हादरा देऊन गेली होती आणि त्यांचे परिणाम सर्वत्र दिसून येत होते. वाङ्:मयीनदृष्टया स्वप्नरंजनात्मक कादंबऱ्याचा काळ होता. ना.सी.फडके आणि वि.स.खांडेकर यांच्या कादंबऱ्या सर्वसामान्य वाचकांना भारावुन टाकीत असत. दुसऱ्या बाजूला हा काळ आपल्या स्वातंत्र्यसंग्रामाचा ही काळ होता. देशभक्तीने भारावलेले तरुण कोणताही धोका पत्करुन देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढत होते. प्रसंगी हिंसक मार्गाचा अवलंब करुन काही काळ तरुण मरणाला सरळ सामोरे जात होते. याचे वर्णन हैद्राबाद मुक्तिसंग्रामावरील कादंबऱ्यात येते आणि पुढे मुक्ती मिळाल्यानंतर दलित व ग्रामीण कादंबऱ्या लिहील्या गेल्या. याचा विचार पुढील प्रमाणे करता येऊ शकतो.

**बी.रघुनाथ :** बी. रघुनाथ हे मराठवाडयातील पहिले कांदबरी लेखक म्हणून ओळखले जातात त्यांनी १९३६ पासून आपल्या लेखनाला सुरुवात केलेली दिसुन येते. 'ओSSS ' ही त्यांची पहिली कांदबरी यातून त्यांनी हैद्राबाद संस्थानातील स्वातंत्र्य चळवळीवर प्रकाश टाकला आहे. याशिवाय, ' हिरवे गुलाब ', ' बाबू दडके ' , 'उत्पात ' , ' म्हणे लढाई संपली ', ' जगाला कळल पाहिजे ' आणि 'आडगावचे चौधरी ' अशा मिळून



Patoda
Coordinator, IQAC
JBSPM's Arts and Science College Patoda
Tq. Patoda Dist.Beed-414204
Principal
J.B.S.P.M.'s Arts & Science College
Patoda,Tq.patoda Dist.Beed

J.B.S.P.M's Arts & Science College
PATODA
Tq.Patoda, Dist.Beed.



एकूण सात कांदबऱ्या त्यांनी लिहील्या. ' हिरवे गुलाब ' आणि 'जगाला कळलं पाहिजे ' या दोन्ही कादंबऱ्या मधून शासकीय यंत्रणेतील भ्रष्ट,अत्याचारी व जुलमी अधिकाऱ्यांच्या मनोवृत्तीचे चित्रण केले आहे. तद्ववतच हिंदू-मुस्लीम संघर्षही चित्रित झाला आहे. एका बेवारस जन्मलेल्या,वार लावून शिकणाऱ्या हुशार विदयार्थ्यांने हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थावरच्या निष्ठेपायी पुकारलेला विद्रोह 'बाबू दड़के ' या कादंबरीत येतो. तर म्हणे लढाई संपली या कादंबरीत एक दरिद्री ओढग्रस्त अवस्थेत जगणारा तुच्छतावादी कारकून वाचकांना भेटतो.

अस्सल ग्रामीण कादंबरी म्हणून आडगाचे चौधरी या त्यांच्या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो.मराठवाडयातील ग्रामीण भागातील सरंजामशाहीचे स्वरुप प्रकट करणाऱ्या नऊ पिढयांचा ,तीनशें वर्षांचा कालखंड चितारणारी ही कादंबरी तत्कालीन सामाजिक वास्तवांचे उत्तम दर्शन घडविते. उपरोधिक उपहासात्मक भाषेत प्रतिमा-पतीकांचाउत्तम वापर करीत तो रघुनाथांनी तत्कालीन इतर लेखकांपेक्षा वेगळी वाट चोखाळली. ज्या मिश्र बहुपेडी भाषिक संरचनेची मूळ आपल्या भोवतीच्या प्रत्यक्ष जीवनात असल्याचे भान ठेवून त्यांनी समकालीन वास्तवाला साकार केले.

याच दरम्यानच्या काळात प्रसिध्द झालेल्या मराठवाडयातील लेखकांच्या आणखी काही कादंबऱ्याचा उल्लेख करता येईल. यात खु.शा.धारपडे यांची 'संघटना ', वसंत देशपांडे यांची ' निराश्रित तरुणी ' यांचा अंतर्भाव करावा लागतो. श्री.र.कुलकर्णी यांची 'नवरात्र संपले ' ही कादंबरी त्या काळातील स्वातंत्र्यासाठी हैद्राबाद मुक्तिसंग्रामत उतरलेल्या विदयार्थ्यांचे आणि त्यांनी त्यासाठी केलेल्या त्यागाचे दर्शन ही कादंबरी घडवते.

**वि.शं.पारगावकर :**

मूळचे मराठवाडयातील परंतु नंतरच्या काळात उदरनिर्वाहासाठी पुण्यात वास्तव्यात गेलेले. ज्यांच्या 'ललाट ', ' वैशाखातील वावटळ '. 'कालचंक्र ' , 'शेवगा ' , 'शेवगा वेडा झाला ' . ' पांढरी माती', ' गोदंण ', 'निगूडा ' आणि 'अंतरिता ' या कादंबऱ्या होत. 'कालचक्र ' या कादंबरीत बीडसारख्या ग्रामीण जीवनाचाच चेहरा असणाऱ्या गावातील एकत्र कुटूंब पध्दतीचे जीवन जगणाऱ्या तीन पिढयांच्या उत्कर्षाचा व नाशाचा आलेख त्यांनी रेखाटला आहे. ज्या कुटूंबातील माणसे कसल्या न कसल्या तरी विकृतीने, वेडाने पछाडलेले आहेत अशा घरातील सदवर्तनी सून व तिचा नवराही विकृतीच्या जगात खेचला जातो याचे चित्रण शेवगा वेडा झाला या कादंबरीत येते. तर निगुडा या कादंबरीत प्राचीन मानवाच्या जीवनामध्ये आजच्या थक्क करुन सोडणाऱ्या प्रगत मानवाच्या जन्मखुणा शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची अंतरिता एक ग्रामीण कादंबरी आहे.

खेडयामध्ये एका विशिष्ट जीवनपध्दतीत ब्राम्हण,मराठा,महार,मांग,चांभार,शिंपी तांबोळी इ.समाज असतो आणि या सर्वांमध्ये आर्थिक,सामाजिक,नैतिक, सांस्कृतिक तसेच प्रतिष्ठाविषयक ताण निर्माण झालेले असतात याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला जातो. समाजजीवनात स्वांतत्र्योत्तर काळात येणारे परिवर्तन टिपण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य आहे.

**रा.रं.बोराडे :** 'पाचोळा ' ही बहुचर्चित कादंबरी लिहीणाऱ्या कादंबरीकाराने मराठवाडयाच्या साहित्याला



Coordinator, IQAC
JBSPM's Arts and Science College Patoda
Tq. Patoda Dist.Beed-414204

Principal
J.B.S.P.M.'s Arts & Science College
Patoda,Tq.patoda Dist.Beed

उभारी आणून देण्याचे कार्य केले आहे. बोराडे यांच्या सर्वच कादंबऱ्यांचा विचार केला तर असे दिसते की, ते सतत ग्रामीण जीवनातील परिवर्तन टिपण्याचा प्रयत्न करतात. स्वातंत्र्यानंतरच्या पंधरा-वीर वर्षाच्या काळात हळूहळू खेडी बदलू लागली. दळणवळणाची साधने निर्माण झाल्यामुळे खेडी शहरांशी जोडल्या जाऊ लागली. ग्रामीण उद्योग आणि गावाचा गावगाडा मोडकळीस येऊ लागला. अशा काळात पारबत्ती आणि गंगाराम या शिंपी कुटूंबाची वाताहत ज्या कारणामुळे झाली त्याची करुण कहाणी पाचोळा या कादंबरीत रेखाटली आहे.

पाचोळानंतर १९८७ मध्ये ' सावट ' ही कांदबरी आली. शिक्षणामुळे आत्मभान आलेल्या ग्रामीण तरुणाची होणारी घुसमट तीत व्यक्त झाली आहे. ' चारापाणी ' या कादंबरीत स्वातंत्र्यानंतरच्या चाळीस वर्षात शासन ग्रामीण माणसाच्या पिण्याच्या पाण्याचे प्रश्न सोडवु शकते नाही. तर 'आमदार सौभाग्यवती ' या कादंबरीत स्त्रीच्या कर्तृत्वात चालना मिळाली तर ती ते कसे कर्तृत्व गाजवू शकते हे या कादंबरीची नायिका सुमित्रा दाखवून देते 'महामानव ' शिका, ' तुम्ही हो शिका ' या किशोर व बाल कादंबऱ्या होत. किल्लारी भुकंपावर आधारित " इथं एक गाव होतं " ही कादंबरी आली.

या नंतरची सहाटपाळणा ही त्यांची एका विधवेच्या भावसंबंधावर आधारित कादंबरी आहे. ' मरणदारी ' या कांदबरीनंतर नुकतीच 'नामदार सौभाग्यवती ' ही कादंबरी आलीय. बोराडेच्या कादंबरीकडे बघितल्यास असे दिसते की त्यांची नाळ गामीण संवेदनेशी पक्की जुळलेली आहे.

**बाबा भांड :** बाबा भांड यांच्य एकुण पाच कादंबऱ्या विशेषत्वाने प्रकाशित झालेल्या आहे. ' जरंगा ' ही किशोर कादंबरी, आदिमतेचा वारसा लाभलेले, धर्मांची झूल पांघरुन तीन डोंगरांच्या मिठीत वर्षानुवर्षे पहुडलेल्या अन आधुनिकतेचं वारं अंगावरही न आल्याने देठापासून तुटल्याने गावाची झालेली वाताहत ही कहाणी आहे. 'धर्मा ' ही त्यांची अशीच एक किशोरवयीन मुलाच्या जीवनावर बेतलेली कादंबरी ' काजोळ ' या त्यांच्या कादंबरीनंतर आलेली त्यांची बहुचर्चित कादंबरी म्हणजे 'दशक्रिया ' ही होय. सामाजिक वास्तवाचे सम्यक आकलन मांडणारी ही कादंबरी आहे. मांगाचा भानुदास घोडके त्याच्या हेमा, मंदाकिनी, रेखा या पैठणच्या नाथघाटावर आणि नागघाटावर साफसुफ करण्याचे काम करतात. भानुदास हा शाळकरी मुलगा चाळणी घेऊन गोदावरीत अस्थी विसर्जनासाठी येणाऱ्या लोकांच्या मागे फिरुन अस्थिमधले पैसे गोळा करण्याचे काम करतो. दशक्रियेचे लाचार व्यवहार भांड यांनी टिपले आहे. सुलभ प्रवाही भाषा हे या कांदबरीचे आणखी एक वैशिष्टये आहे.

'तंटया ' या कादंबरीत ऐतिहासिक संदर्भ आहेत तसेच लोकजीवनातील दंतकथेचे आवरणही आहोत. अशा या दंत आणि लोककथांच्या आवरणा खालच्या इतिहासाचा मागोवा घेत 'तंटया ' कादंबरीची निर्मिती झालेली आहे. एका बाजूला सर्जनात्मक कल्पनाशक्ती आणि दुसऱ्या बाजूला संशोधन यातून प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न यात झालेला आहे. सरकारी दरबारी दरोडेखारे ठरलेल्या 'तंटया ' या लोकविलक्षण आदिवाशीच्यानायकाची ही कहाणी भांड यांनी मोठया सामर्थ्याने रेखाटली आहे.

**ना.धों.महानोर :** महानोरांची ' गांधारी ' ही कादंबरी १९७३ साली प्रकाशित झाली. रझाकारांनी उदध्वस्त केलेले गांधारी हे गाव आणि नंतर स्थिर झालेल्या या गावात राजकारणामुळे जी अस्थिरता आली त्याचे



Principal
J.B.S.P.M.'s Arts & Science College
Patoda,Tq-patoda Dist.Beed

Coordinator, IQAC
JBSPM's Arts and Science College Patoda
Tq. Patoda Dist.Beed-414204

J.B.S.P.M's Arts & Science College PATODA Tq.Patoda Dist.Beed.



चित्रण महानोरांनी या कादंबरीत केले आहे रझाकारांनी जी पशुवत पातळी गाठली त्याची झळ,गांधारीला पोहोचली रझाकार येणार हे अगोदरच कळाल्यामुळे गावातील लोक गाव सोडून निघुन गेले आणि परत तीन-चार महिन्यांनी जेव्हा गावात परत आले पण गावात जे राजकारण शिरले त्याने पुन्हा उग्र रुप धारण केले. त्यातून भांडणे, कोर्टकचेऱ्या वाढल्याने गांधारी पुन्हा अस्थिर झाली. कोंडीत सापडलेल्या गावाचे वास्तव चित्रण महानोर यांनी या कादंबरीतून केले आहे.

**गणेश आवटे :** ' चुकारा ' , ' गणगोत ', ' पानसळ ' आणि ' भिरुड ' या कादंबऱ्या लिहिणारे कादंबरीकार आहे. शिकून बेकार होणाऱ्या तरुणाचे मनोगत व्यक्त करणारी 'चुकारा ' ही कादंबरी आहे. ' गणगोत ' ही एक लघुकादंबरी आहे. ती हुंडयाच्या ज्वलंत व तापदायक प्रश्नावर आधारलेली आहे. करुण भयंकर व हृदयद्रावकअशी भावकथा आहे. समकालीन सामाजिक वास्तवाचा, विशेषत: ग्रामीण वास्तवाचा एक भाग सजीव साकार करण्याचा एक एक वैशिष्टयपुर्ण प्रयत्न आहे. गणेश आवटे यांची भाषेवर आणि शैलीवर असलेल्या विलक्षण हुकूमतीचा प्रत्यय या कादंबरीतून येतो.

गणेश आवटे यांचया कादंबऱ्यातून प्रकट होणारा अनुभवांचा प्रदेश हा प्रामुख्याने ग्रामीण आहे. खेडयातील शिकलेल्या सुशिक्षित बेकारांची स्थिती मोठी विचित्र होते. शिकून नोकरी किंवा इतर व्यवसाय करणे शक्य होत नसेल तर शेतीशी निगडित अशी कामे करायला हरकत नाही परंतु शिकलेल्या या मुलाला शेतीतील कष्टाची सवय मोडलेली असते. आई जेऊ देईनाबाप भीक मागू देईना, अशी अवस्था होते. अशी ही 'पानसळ ' आहे ' भिरुड ' मधून राजकारण आणि स्वार्थी वृत्तीच्या माणसाने आतून गाव कस पोखरुन काढला याचे वर्णन येते.

**त्र्यंबक आसरडोहकर :** १९८५ मध्ये त्र्यंबक आसरडोहकरांची ' काळी आई ' ही धरणग्रस्ताच्या प्रश्नावर आधारलेली कादंबरी प्रसिध्द झाली. त्याआधी त्यांच्या ' हऱ्या -नाऱ्या ' व ' लीडर ' या दोन कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या. याचा आशयभागही ग्रामीणच आहे. ग्रामीण जीवनातील सुशिक्षितांची भोंदूगिरी, हऱ्या-नाऱ्या मध्ये चित्रित झाली आहे.तर लीडर या कादंबरीत ग्रामीण नेतृत्वच ग्रामीण माणसांचे शोषण करते यावर प्रकाश टाकला आहे. ' काळी आई ' मध्ये ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी शासन धरणासाठी ताब्यात घेते, त्यांची जमीनही जाते आणि हाती आलेला पैसाही कसा अनेक वाटांनी जाऊन कफल्लत होण्याची पाळी येते याचे काहीशा उपहासात्मक भाषेत आसरडोहकरांनी दर्शन घडविले आहे.

त्र्यंबक आसरडोहकरांच्या कादंबऱ्या बहुअंशी प्रादेशिक आहेत. त्यांच्या कादंबरीतून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडते. ग्रामीण माणूस,शेती आणि शेतकरी यांच्या समूह जीवनावर आपल्या कादंबऱ्यातून भाष्य केले आहे. म्हणून मराठवडयाच्या ग्रामीण मातीचे प्रातिनिधिक ,लेखक म्हणून हे वैशिष्टयपूर्ण आहे.

**नागनाथ कोत्तापले :** डॉ.नाथनाथ कोत्तापल्ले यांचे लेखक म्हणून व्यक्तिमत्वही बहुआयामी आहे. विविध साहित्यप्रकार ते लीलया हाताळतात. ' पराभव ', 'मध्यरात्र ' व ' गांधारीचे डोळे ' या त्यांच्या कादंबऱ्या होत. आजच्या बदलत्या सामाजिक, राजकीय पर्यावरणात नीतीने काही धरु धजणाऱ्या माणसाला पराभुत व्हावे लागते हे कटूसत्य ' पराभव ' या कादंबरीत मांडले आहे. ' मध्यरात्र ' ही कादंबरी पूर्वी 'उलट चालिला प्रवाहो ' , या नावाने प्रकाशित झाली होती. दलित ग्रामीणांना शोषणामुक्त करण्याच्या प्रयत्नात



Coordinator, IQAC
JBSPM's Arts and Science College Patoda
Tq. Patoda Dist.Beed-414204

Principal
J.B.S.P.M.'s Arts & Science College
Patoda,Tq.patoda Dist. Beed

असलेली माणसंच पुन्हा जातीपातीच्या राजकारणाला कशी घट्ट चिकटून बसतात हे यात बघायला मिळते. तलदर्शी जीवन चित्रण, सहज निवेदन आणि प्राकथ्थांचा समर्थ वापर , प्रत्ययकारी जीवन दर्शन हे या कादंबरीचे वैशिष्टय आहे. ' गांधारीचे डोळे ' या कादंबरीचे शीर्षकच मोठे समर्पक आहे. कादंबरीतील आशयाने वाचकांला अंतर्मुख व्हायला लावणारी ही एक राजकीय स्वरुपाची कादंबरी आहे.ती आजच्या समाजस्थितीचा विचार करायला लावते आणि यातच तिचे यश सामावलेले आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीतील राजकारणात काय घडु शकते याचा अदमास या कादंबरीतून येतो. सारे समाजमन षंढ झाल्याची जाणीव या कांदबरीत गांधारीचे प्रतीक वापरुन कोत्तापल्ले यांनी मांडली केली आहे.

या शिवाय लक्ष्मीकांत तांबोळी, महावीर जोंधळे, रेखा बैजल, शेषराव मोहिते, लक्ष्मीकांत देशमुख,भारत काळे,वासुदेव मुलाटे, सुधाकर डोईफोडे, डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या कादंबऱ्यात विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. या सर्व कादंबरी लेखनराचा विचार केला तर मराठवाडयातील बहुसंख्य कादंबऱ्यांनी बदलत्या वास्तवाचे वेध घेण्याचे प्रयत्न केले आहेत. हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि ग्रामीण जीवन हे त्यांच्या आत्मीयतेचे विषय आहेत. ग्रामीण दलितांच्या प्रश्नांबरोबरच काळाच्या ओघात जीवनात विविधांगी होणारे बदल त्यांनी टिपण्याचा प्रयत्न केलाय. राजकारण, समाजकारण, अर्थकारण अशा विविध जीवनक्षेत्रावर आधारित कादंबरी लेखन आहे. या सर्वांचे प्रयोजन बदलते समाज वास्तव शब्दात पकडून वाचकांसमोर मांडणे हेच आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) मराठी ग्रामीण कादंबरी - डॉ.रवींद्र ठाकूर - मेहता पब्लिसिंग हाऊस,पुणे.-३०
२) मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा - डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर - मेहता पब्लिसिंग हाऊस,पुणे.-३०
३) ग्रामीण साहित्याचा इतिहास . संपा-डॉ.नलगे साकेत प्रकाशन औरंगाबाद.
४) ग्रामीणता साहित्य आणि वास्तव - आनंद यादव - मेहता पब्लिसिंग हाऊस,पुणे.-३०
५) ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध -नागनाथ कोत्तापल्ले - मेहता पब्लिसिंग हाऊस,पुणे.-३०
६) गांधारी - ना.धों.महानोर - पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
७) अनुष्टुभ - जुलै ते ऑगस्ट १९८२
८) प्रतिष्ठाण - (कादंबरी विशेषांक ) जाने.१९८१.




J.B.S.P.M.'s Arts & Science College Patoda Tq.Patoda Dist.Beed

Coordinator, IQAC
JBSPM's Arts and Science College Patoda
Tq. Patoda Dist.Beed-414204

Principal
J.B.S.P.M.'s Arts & Science College
Patoda,Tq.patoda Dist.Beed